विजय खाडिलकर

सिगरेटच्या कथा



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

सिग्रेटच्या कथा

कथासंग्रह

श्री विजय खाडिलकर

सिग्रेटच्या कथा

लेखक: विजय खाडिलकर

1403, माझगांव टॉवर्स, म्हातारपाखाडी,

माझगांव, मुंबई 400010

दूरध्वनि: 23776889, मोबाईल क्र. ९८२१२२२०४२

इ मेल vijay.s.khadilkar@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : १७ सप्टेंबर २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. १५०/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- विजय खाडिलकर - ९८२१२२२०४२

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

श्री विजय खाडिलकर

कलावंताला त्याच्या कलेहून अधिक वेगळ्या ओळखीची गरजच नसते असे म्हणतात. ई साहित्य प्रतिष्ठानचे वाचक विजय खाडिलकर यांना “खिडक्या”, “भोज्जा” व “धर्म” या कथासंग्रहांचे लेखक आणि वास्तुपुरुष आणि मोर्चा या नाटकांचे नाटककार म्हणून ओळखतात. त्यांच्या सहाही ई पुस्तकांना वाचकांची पसंतीची दाद मिळाली. त्यामुळे हे सातवे पुस्तक. पाचवा कथासंग्रह.

श्री विजय खाडिलकर यांच्या कथा वाचल्यावर हे जाणवते की या लेखकाने आपले लेखन आयुष्यभर जोपासले असते तर मराठीला एक विशेष लेखक मिळाला असता. पण फ़ार विषादाची गरज नाही. बहुराष्ट्रीय कंपनीतून निवृत्तीनंतर त्यांनी आपली लेखनकला जोपासली आणि अनेक कथा, कविता, कथासंग्रह व नाटक असा खजिना वाचकांसाठी उपलब्ध करून दिला. हे पुस्तक म्हणजे त्यांच्या संपूर्ण खजिन्याची एक झलक म्हणता येईल. खिडक्या, लालबत्ती, सरसरती सर. परिक्रमा: हे कथासंग्रह व वसंतचाहूल हा कवितासंग्रह, पारंब्या.. ही कोमसाप स्पर्धेत पारितोषिक पात्र कादंबरी. या शिवाय दिवाळी अंकातून कथा व कविता येत असतात..

श्री विजय खाडिलकर हे जी ए कुलकर्णी यांचे चाहते. त्यामुळे त्यांच्या कथांतून जी एंची झलक दिसते, त्याचबरोबर त्याहून वेगळं

लिहिण्याची उबळही जाणवते. मानवी नातेसंबंधांतली असहाय्यता आणि सौंदर्य यांचा वेध हे जीएंच्या कथांचं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य. ते खाडिलकरांच्या कथेतूनही ठळकपणे प्रत्ययाला येतं. कथेला नाट्यापेक्षा काव्यगत सार्वत्रिकता हेही जिएंचं वैशिष्ट्य खाडिलकरांच्या कथेतून जाणवतं.

पात्रांच्या मागची सामाजिक धार्मिक पार्श्वभूमी ठळक करताना काळ आणि परिसर यांत मात्र खाडिलकरांनी स्वतःचा वेगळा प्रांत चोखाळला आहे. विजय खाडिलकरांच्या कथांतून प्रत्ययाला येणारा धर्म हा surrealistic आहे. तो आहेही आणि नाहीही. वास्तव आहे. पण भिंती आणि भितीच्या पलिकडे जाऊन दोन काठांना जोडणारा पूल आणि भिन्न प्रकृतींना जवळ आणणारा पूल असे त्याचे स्वरूप जाणवते. सहृदयी वाचकांना भुरळ पडेल असे विजय खाडिलकरांचे कथानक आणि वाचताना रममाण व्हायला लावणारी त्यांची शैली यांचं गारूड वाचकावर खुप काळपर्यंत रहातं.

विजय खाडिलकरांचं हे पुस्तक तुम्हाला कसं वाटलं ते जाणून घ्यायला आवडेल. तुमचा विस्तृत अभिप्राय आल्यास आम्ही ऋणी राहू. ई साहित्य प्रतिष्ठान हे साहित्यावरच्या चर्चेचं व्यासपीठ व्हावं ही मुख्य प्रेरणा आहे. ते तुमच्या अभिप्रायांतूनच साध्य होऊ शकेल.

धन्यवाद

सुनीळ सामंत, टीम ई साहित्य

अर्पणपत्रिका:

"आयुष्य नावाच्या प्रवासाला समर्पित"

कथानुक्रम

लेव्हल क्रॉसिंग

गोष्ट एका सिग्रेटची

प्लॅट्फॉर्म

µµ ** लेव्हल क्रॉसिंग ** µµ

भीति वाटायची सुरवातीला पण लेव्हल क्रॉसिंग करावंच लागायचं.. केवळ पूल क्रॉस करावा लागू नये म्हणून..सरळ प्लॅटफॉर्मवर जायला मिळायचं तेही ठराविक डब्याजवळ..

पण कधी कधी दोन्हीकडच्या गाड्या जाऊन गेट उघडेपर्यंत थांबावं लागायचं. तेवढ्या वेळात अलिकडच्या रेल्वेलाईनच्या भिंतीला लागून असलेल्या खोपटातून एक सिग्रेट घेऊन ओढायची हा शिरस्ता.. पण गाडीच्या वेळेआधी यायला जमलं तरच.. नाहीतर प्लॅटफॉर्मच्या आधीच ती टाकून द्यावी लागायची. गेट उघडेपर्यंत वाहनांची रांग लागायची..मग हातात सिग्रेट घेऊन फ़ाटकाच्या अलिकडे कंपाउन्ड वॉलला लागून सरळसोट वाढलेलं कसलंतरी मोठ्ठ झाड होतं; त्याच्याखाली उभं रहायचं..सांवली नाही तरी तो एक कोपरा गाडीसाठी येणाऱ्या सहप्रवाशांशी उभ्या उभ्या गप्पा मारायला बरा होता.

हे सकाळी जाताना...परत येतानाही संध्याकाळी तीच क्रिया रिपीट, फ़क्त वेळेत थोडा बदल व्हायचा..कारण दोन्हीकडच्या गाड्या जाईपर्यंत वाहनांसाठी गेट बंद मग आम्हीही प्लॅटफॉर्मवरच..पण

स्टेशनच्या गर्दीत ब्रिजवरून चढून बाहेर पडायचं नि शेअरिंग का होईना रिक्षाला पॅसे द्यावे लागायचे, त्या पेक्षा हा शॉर्टकट बरा वाटायचा. फ़क्त गेट उघडं असेल तेव्हां .

मग सिग्रेट पेटवीपर्यंतचा संवाद, त्या परप्रांतिय विडीवाल्याजवळ, त्याच्याच भाषेत. त्याचं नांव बहुतेक बबलू का कायसं होतं..म्हणजे सतत येणारे मावावाले पंटर त्याला तशी हाक मारायचे.

तेही धेडगुजरी हिंदीमधे..

'ए बबलू, मेरा एकसोबीस बनाके रख, मॅ आता..अब्बीच आगे जाके."

तर दुसरा सिग्रेट पेटवतानाच..

'बबलू अपना आयटम इदरसे गया क्या ?' म्हणजे त्याची गर्लफ्रेन्ड..हेही काम होतंच बिचाऱ्याला ! त्याचं भिंतीला लटकवलेलं पान-बिडीचं खोकडं नि खालचं, दोरीने भिंतीच्या खिळ्याला बांधून ठेवलेलं लाकडी स्टूल हे सोडून तो कुठे जाऊ शकत नव्हता तरीही गेटमनला लघवीला जायला मधेच जाऊन सोडवायचा.. तो गेटमन रेल्वे लायनीतच जरा पुढे कंपाउन्डच्या भिंतीलगत धार मारून येईपर्यंत.

मग एखादं कटिंग दोघांच्यात व्हायचं. मलाही कधी विचारायचा.. हा कटिंगवाला हातात किटली घेऊन फ़िरतच असायचा. त्या बबलूच्या बॉक्सवाल्या भिंतीला लागून एक जुनं गोडाऊन होतं. त्यात एक बोळ

होता तिथे बहुतेक चहावाल्या भटाचं टेबल होतं नि लागूनच त्याच्या भाऊबंदाचं इस्त्रीचं बाकडं..किटलीवाल्या पोराला निरोप दिला कि इस्त्रीवाला भेय्या आतल्या सोसायट्यांमधे नेमकेपणाने जाऊन कपडे घेऊन यायचा..

त्यामुळे गेटमन पासून इस्त्रीवाल्यापर्यंत त्या लोकांची संवय झालेली, म्हणजे लेव्हल क्रॉस करणाऱ्या बऱ्याच जणांना हे सर्व माहित झालेले....

क्वचित कोणी, बबलू समोर गेला कि हातानेच सिग्रेट काढून पेटवायचा नि पॅसे त्याच्या गल्ल्याच्या बंद पेटीवर ठेवून बबलूला खूण करायचा. कटिंगवाला पोऱ्याही कधीमधी हे काम करायचाच. मीही कधीतरी तसंच करायचो.. तरी धावत येऊन बबलू विचारपूस करायचाच.. जसं मला न भेटण्याने त्याचं मोठ्ठं गि-हाईक जाणार असतं.. मी मग सिग्रेट घेतल्यावर सुट्ट्या पॅशाचं च्यूईंग गम सारख कायतरी घ्यायचो..

'क्यूं साब आज गाडी लेट हुवा ?'

' नै रे.. मैनेच एक गाडी छोडा.. भोत भरेला था..बॅठनेकू नै मिलता.'

' हापिसमेंसे जल्दी नै निकलनेकू सकता ?'

' नैना...ठेसन पॉंचनेसे पॅलेच गाडी निकल जाती..और साला फ़र्स्ट क्लासका पास निकालके खडा कॉन -हेंगा.. गाडी प्लॅटफॉर्म पर लगी कि पब्लिक घूस जाती हॅ, फ़र्स्ट क्लासमेंभी....'

'भोत खराब हालत हे ! ' शेजारी मावा खायला आलेला ओळखीचा चेहरा एकदम बोलका होतो.

' हां देखो कपडेकी हालत..'

'हां साब, ये रेल्वेमें कपडेकी तो मां..... ' हा अजून एक पंटर मावावाला..त्याच्याच भाषेत.

आपण आपला अर्धवट गांठ सेल झालेला टाय हळूच काढून खिशात ठेवायचा..

चालायला सुरवात करण्याची संधी शोधावीच लागते..कारण तोवर स्टेशनवरचा माणसांचा नि रिक्षांचा लोंढा सर्व्हिस रोडच्या बाहेर पडून अंगावर आदळण्याची शक्यता असते. ती बघूनच आपली फ़ुटपाथ तीही फ़ेरी वाल्यांना चुकवून धरावी लागते..तेही मधे मधे भाजी घ्यायला थांबणाऱ्या मध्यमवयीन गृहिणींच्या सुकल्या गजऱ्यांच्या वासातून आणि त्यांच्या आपसातल्या संवादातून..

'अगं, दामलेबाई नव्हत्या आज गाडीला !'

'त्यांची चुकली बहुतेक..त्याना शरिर आवरत नाही..त्या कुठल्या धावपळ करणार !'

ह्यावर त्यांचं फ़िदीफ़िदी हंसणं..

'उद्या येताहेत का नाही कोण जाणे !'

'का हो ?'

'अगं उद्या संक्रातीचं वाण द्यायचंय ना ? विसरलीस ?'

'अय्या बरी आठवण केलीत..मी हेअरक्लिप्स घेऊन ठेवल्याहेत त्या आणीन..'

'गाडीतच घेतल्यास ना ?' हा चिमटा !

'हो. पण स्वस्त नाही हो..ते जाऊ दे तुम्ही सोनचाफ़्याची फ़ुलं आणताय ना ?'

'हो. घेतलीसुद्धा स्टेशनबाहेर..आता फ़्रीजमधे ठेवते गेल्या गेल्या..'

'हो. नाहीतर पाकळ्या गळतील.'

'आणि तो हलवा ? कोण आणणारे ?'

' म्हणून तर विचारलं..दामलेबाईंनाच सांगितलं होतं ना. पण तुम्ही तुमचे ते तिळाचे लाडू आणा बरं का..'

एवढ्या गडबडीत दुसऱ्या दोघी मधेच हाक मारून पुढे जातात..

त्यातल्या एकीच्या अर्ध्या उघड्या पाठीकडे पहात पहिल्या दोघींची नेत्रपल्लवी, जसं कांही पहिल्यांदार पहात होत्या..

गेली तिच्या कांचोळीचा शोभेचा गोंडा लयीत हलत असतो.. अलिकडे नितंबावर झुलणाऱ्या केसांच्या शेपट्याऐवजी हे गोंडेच जास्त लयबद्ध हालचाल करतांना दिसायचे..बरोबरीची आपल्या पंजाबीच्या ओढणीचा सरकणारा शेव पुन:पुन्हा खांद्यावर टाकत चालत असते.

तिच्याचकडे पहात एकजण बोलते,

'अगं मानसी लक्षात आहे ना उद्याचं ? काळी साडी नेस नि कुंकू लावायला विसरू नको..'

ती मानसी मागे वळून हंसते नि पुन्हा एकदा घसरणारी ओढणी खांद्यावर टाकत फ़क्त हात हलवून पुढे जाते, तरीही चिकाटीने पहिली मानसीबरोबरच्या मुलीला परत एकदा आठवण करते..

' ए सांवत , ये गं उद्या नऊ वीसला..जरा लवकर ये.प्लॅटफॉर्मवर गर्दी व्हायच्या आधी.'

मग भाजी निवडून घेतांना पुन्हा आपसात सुरू..

'हो ना..वरूनच भरून येते गाडी ..'

मधेच भाजीवाल्या बाईला ,

'अहो काय हे ? भेंडी वीस रुपये पाव ?'

'कठीणचे, भाजी घेणं !'

'नाही तं काय ?"

'आओ बाय़, मलाबी काय सुटाय पायजे का नाय ? घ्या.. पंधरानं देती.."

मधेच कटिंगवाल्याला निरोप..

'ए पोऱ्या, इस्त्रीवालेको वो वाली सोसायटीमे भेजो, कपडा हे.'

ती 'वो वाली ' सोसायटी दोघांनाही कळायची..चहावाल्याला नि इस्त्रीवाल्यालासुद्धा..कारण मधे एक पंटर होताच..बद्री !

हे असंच चालू रहाणार असतं...शेवटी त्यां बायांना वळसा घालून त्यांच्या अंगावर धूर न जाईल ह्याची खात्री करून पुढे जायचं..

कधीतरी त्यातली एखादी कुजबुजायची..

'काय तरी धुराचा त्रास हा..लोकं समजतच नाहीत..'

'अगं, थांब..तो बाजूच्या सोसायटीतल्या टीचरचा नवरा आहे..'

'ही कोण ?'

' श्रीविद्या मधली ट्यूशन घेणारी जोशीबाई....'

आम्ही खरं तर साटम, पण बायकोच्या शुद्ध ब्राम्हणी उच्चारात बोलण्याने सोसायटीवाल्या पालकांनी तिला जोशीबाई करून टाकलेलं. सोसायटीत तर इतरांना आमचं इन्टरकास्ट मॅरेज वाटायचं. त्यांच्या तोंडून बायकोचा उल्लेख ऐकू न आल्यासारखं करून सिग्रेट बंद मुठीत धरून पुढे जायचं..

मधेच ती अनऑफ़िशिअल खाऊगल्ली. अगदी पाणीपुरीपासून डोशांपर्यंत नि सॅन्डविचपासून चायनीजपर्यंत..रात्री तर म्हणे गर्दी होते, उशिरा येणारे खाऊनच पुढे जातात! जात असतील, सिंगल पोरांची सोय.. त्यात तो सॅन्ड्विचवाला, तसा जरा पुढे गेल्यावर सोसायटीच्या गेटाजवळच..

तो सॅन्डविचवाला नि त्याचे ते टोस्ट शेगडीवर भाजायला मदत करणारा, एका डोळ्यात फ़ूल पडलेला अर्धी चड्डीवाला बद्री हे मात्र

सगळ्या सोसायटीवाल्यांच्या परिचयाचे..तोच घेऊन जायचा घरपोच. तीही फ्री डिलिव्हरी..

हा माणूस हरकाम्या होता..सोसायटीत गाडीत सामान चढवायपासून कचरेवाल्याला त्याची ढकलगाडी गेटातून बाहेर काढून देण्यापर्यंत कसलीही मदत तत्परतेनी करायचा. मधेच इस्त्रीचे कपडे न्याय-आणायलाही उपयोगी पडायचा..

एकाच नाही, दोनतीन सोसायट्यांमधल्या लोकांना तो आणि लोकं त्याला ओळखायची.. सॅन्डविचवाल्याची मदत हे त्याचं संध्याकाळचं पार्टटाईम काम..सांगून ठेवलं कि मधेच सॅन्डविच घरी आणूनही पोहोचवायचा..आळशी (!) लोकं इन्टरकॉमवरून गेटवरच्या सिक्युरिटीवाल्याजवळ निरोप द्यायचे नि बद्री ती ऑर्डर घरपोच द्यायचा..

संध्याकाळी परतणाऱ्या गाड्यांसाठी सोसायटीचं गेट उघडण्याच्या कामाबरोबरच वॉचमनला अजून एक काम.एखादं खेळायला खाली आलेलं पोर येऊन सांगायचं कि...

'वॉचमन अंकल, वो बद्रिभैय्याको बोलो ना हमारा मम्मी उप्पर बुलाता हे.."

मग वॉचमन एकवार ते पोर कुणाचं ह्याची खात्री करून मग गेटबाहेर डोकं काढून बद्रीला आवाज द्यायचा..

'ए बद्रिभैय्या..देख वो बारासो एक वाली मेमसाब बुलाती हे..'

'हां. जाऊंगा बादमें..ये पांच और छे मालेवालोंकी ऑर्डरभी लेके जाना है, एकसाथ जाउंगा..'

हा बद्री गेटबाहेरच असतो पण त्याला कधी कोणी कुठे जाता येतांना पाह्यलेलं नसतं.

तो कुठून येतो नि कुठे रहातो कांही माहित नसतं..कामं मात्र सगळ्यांची करतो..लोकं म्हणायची तो सिक्युरिटीच्या बूथमधेच झोपतो..नि त्यांच्याच टॉयलेटचा वापर करतो..

अंघोळ वगैरे तितपतच..पण असायचा स्वच्छ. कपडे बदललेले..धुतलेले कुठे ठेवायचा कोणी बघितलेलं नाही..शाळेच्या मुलांना त्यांच्या बसमधे बसवून द्यायचा नि उतरवून घरी सोडायचा..आया बिनधास्त. जवळपासच्या बहुतेक मुलांना बद्री नांवाने ओळखायचा.

त्यामुळे आमच्यासारख्यांना तो अमक्याचे पप्पा किंवा मम्मी म्हणून संबोधायचा.

बहुदा रविवारच्या दुपारी रस्ता सुस्त पडलेला असतांना त्यावर दोनचार सोसायट्यातली मुलं एकमेकांना खालूनच हाका मारून क्रिकेटचा डाव मांडीत..त्यातही हा जबरदस्तीचा अंपायर व्हायचा..

हा बद्री त्या लेव्हलक्रॉसिंगच्या ड्यूटीवाल्यांकडेही डोकवून यायचा..सोसायटीतल्या लोकांना संशय होता कि हा त्याच्या त्या टपरीतच जेवण करतो..सगळेच गरजू एकमेकांना धरून..रात्री खोकं

बंद करून स्टेशनपलिकडच्या झोपडपट्टीत जाणारा बबलूसुद्धा बद्रीच्या भरवशावर मधेच जेवायला जावून यायचा...

सोसायटीपासून थोड्याच अंतरावर ती लेव्हलक्रॉसिंग..म्हणजे शॉर्टकट. पासवाले जायचे. एरवी तिकिट काढण्यासाठी स्टेशनला जायला मात्र बाजूच्या सर्व्हिसरोडचा वळसा म्हणून मग शेअर रिक्षा..अजबच होतं सगळं ! पादचारी पूल होणार म्हणतात पण वाहनांसाठी गेट हवंच होतं. होईल तेव्हां होईल पूल..सध्यातरी खडीवरून कसरत करीत सॅन्डलवाल्या जाताहेत.

त्या लेव्हलक्रॉसिंगमुळे गाड्या अगदी जवळून जाण्याचा फ़ील द्यायच्या..त्यांच्या आवाजामुळे.

क्वचित एखादी लांबलचक मालगाडी बराच वेळ तो विशिष्ट 'खटखट खट..' असा आवाज घुमवीत जायची..पण बहुतेक रात्रीच्या वेळीच.शांत वेळी दूरवरच्या सोसायटीतही ती खटखट ऐकू यायची...

त्या गेटजवळच्या ड्यूटीवरच्या माणसाला किती त्रास..विशेषत: दिवसपाळीवाल्याला तरी. कारण क्रॉसिंगला साठून रहाणारी वाहनं नि समोर रुळावरून दर दोनतीन मिन्टांना गाड्या येतजात असत. तरी ते लोक तसे सुखात असावेत असं वाटे. तक्रार कोणाचीच नव्हती. स्थानिक नगरसेवकाशिवाय..त्याला आपल्या नांवावर श्रेय हवं असावं म्हणून केव्हांतरी रेल रोको करायचा प्रयत्न केला होता म्हणे..पण फ़सला....

माझा हा लेव्हल क्रॉसिंगचा शॉर्टकट आमच्या घरी माहित होता आणि त्यावर बऱ्याचदा बायको माझी शाळा घ्यायची, होती मास्तरीणच..म्हणायची,

'रिक्शाचे पॅसे वाचवून सिग्रेटीला घालवतोसच कि..!'

झालं, माझ्या जातायेतांना बबलूकडे दोन नि लंचमधे ऑफ़िसच्या खाली एक अशा तीन सिग्रेट आणि जाऊन येऊन स्टेशनच्या रिक्षाचे पॅसे ह्याचा हिशेब मांडत बसायला नको वाटे !

मात्र प्रशांतला क्रॉसिंगची परमिशन नव्हती..तशी गरजही पडली नाही आधी.. हल्लीच नववीच्या क्लास्साठी मात्र त्याला पलिकडे जावं लागायचं..दोघं मित्र रिक्षाने जायचे..पावसाचं पाणी भरलं कि स्कूलबसच लांबचा वळसा घेऊन यायची त्यामुळे धोका वाटत नसे..

....

असेच दिवस जात राह्यले, रेल्वेच्या कंपाउन्डच्या भिंतीलगत अगदी रेल्वेलाईनच्या समांतर टोकाला झोपड्या नि मधेमधे दुकानांचे. विशेषत: घाऊक कांदेबटाटे नि नारळवाल्यांचे त्यांनीच आधी कच्चे नि मग पक्क बांधकाम केलेले गाळे होतेच..त्यावर हळू हळू रहाण्यासाठीचे माळेही चढले नि हळूहळू भाडं देऊन रहायला आलेल्या गांववाल्यांचे जथ्थे वाढत गेले..भिंतीना भगदाडं पडली नि मग लेव्हलक्रॉसिंगची गरजच संपली, वाहनांशिवाय ! पण पावसाळा सोडून..

तेव्हां मात्र इलाजच नसायचा..कारण झोपड्यांच्या बाजूचा सर्व्हिसरोड नेहमीच पाण्याने भरलेला. थोडं उंच असल्यामुळे असेल पण फ़क्त लेव्हल क्रॉसिंगवर पाणी नसायचं, अगदी रेल्वेलाईनमधे पाणी भरलं असलं तरीही..

एरव्ही लेव्हलक्रॉसिंग फ़क्त सोसायट्यांमधल्या लोकांसाठी उरलं होतं..त्यातही बरीचशी बायामाणसं रिस्क नको म्हणून शेअर ऑटोने जाणार..नि फ़क्त आमच्यासारखे सडे लोक लेव्हलक्रॉसिंगवर ! तरीही गि-हाईक वाढलं होतं, बबलूचं नि तिकडे संध्याकाळच्या खाऊगल्लीतही ! एकूण गर्दीच वाढलेली.. ..

आला दिवस जात होता..

एकदा नेहमीचे ते सुवासिक अडथळे पार करून घरी परतल्यावर डायनिंग टेबलवर बायको सगळ्या भाज्यांचा एकत्र ढीग घेऊन वेगवेगळ्या करत बसलेली दिसली..बहुतेक उंधियोच्या भाजा असाव्यात..चला, उद्या डबा बहुतेक इतर लोकंच धुवून देतील !

बेसिनजवळ हाततोंड धुवून टेबलवर येतांना म्हटलं, ' हा कसल ढीग घेऊन बसलीयेस..

आणि चहाचं काय ? '

'आहे..सगळं तयारे..मीही आत्ताच ट्यूशनवरनं आलेय ना .घेकी गरम करून..आणि मायक्रोमधे साबुदाण्याची खिचडी डिशमधे आहे तीही घे गरम करून..'

'साबुदाणा खिचडी नि मायक्रोमधे ? '

'छान होते कि..बघ तरी. माझा हात मोकळा नाहीय म्हणून. आणि प्रशांतही क्लासला गेलाय.'

हे खिचडी प्रकरण आम्हा दोघा बापलेकांचा वीक पॉइंट होता तरी मायक्रोमधली शॉर्टकट खिचडी बहुतेक वेळा गोळ्यांमधे रुपांतरीत झालेली असायची..

नको वाटत असलेली सगळी कवायत करून खायला बसणार एवढ्यात बेल वाजली..

'बघ रे जरा..आत्ता कोण असेल ? प्रशांतला वेळ आहे अजून.'

दार उघडतो तो दारात प्रशांतच, पण वेगळ्याच अवतारात. आणि त्याचं बखोट धरून बद्री !

प्रशांतचा चेहरा रडवेला, शर्ट मळलेला नि हाताची कोपरं नि ढोपरं खरचटलेली..!

'काय रे ? काय झालं ? ' माझा काळजीचा सूर ऐकून बायकोही उठून आली..प्रशांत आत आला नि बॅग टाकून सोफ़्यात बसला. कांही न बोलता ! बायको शेजारी घाबरून बसलेली..

तिकडे दरवाजाजवळ बद्री सुरू झालेला..

'कितनी बार ये बाबालोगको समझाया कि गेट खुलनेतक क्रॉस नै करनेका..फ़िरभी सुनताच नै. ये तिनों तो रोज ऐसाच करते.."

इकडे हिची प्रशांतशी प्रश्नोत्तरं, तीही न थांबता ! तो बिचारा गांगरलेला नि घाबरलेलाही.

समजलं ते असं कि हे तिघे मित्र रिक्षाचे पॅसे वाचवून परस्पर हॉटेलिंगला खर्च करायचे किंवा वर्गणी काढून क्रिकेट किट आणायसाठी साठवायचे. मग लेव्हलक्रॉसिंग हा बरा पर्याय मिळाला. बद्रीला हे माहित होतं नि त्या बबलूलाही बहुतेक..पण त्याला हा माझाच मुलगा हे माहित नसावं..आज मात्र ते तिघंही गेट उघडायची वाट न पहाता क्रॉस करायला गेले तो गाडी येत होती..स्टेशनमधूनच सुटलेली असल्यामुळे वेग घेतला नाही नि मोटरमन जोरात हॉर्न वाजवत रहायला..नेमका पलिकडे घराकडे गेलेला बबलू मागे होताच, त्याने तिघांना मागे खेचले त्यात धडपड झाली नि खरचटलं..मग अलिकडे आल्यावर बबलूने तिघांना, दुकानावर थांबवून ठेवलेल्या बद्रीच्या स्वाधीन केलं..

'ये ले तेरे सोसायटीवालोंकी अमानत..हात पकडके क्रॉस करने निकले थे अब्बी ! अपनेको पता नही क्या करना पडता..!'

लहानपणापासून त्यांना रोज शाळेच्या बसमधे चढवणारा बद्री क्षणभर थरथरला नि पहिल्यांदाच त्याने तिघांच्याही सटासट लगावल्या..अधिकाराने !

'अब्बी तुमकॊ कुछ होता तो ? तुम लोगका माबापको क्या बोलता हम ? इत्तेसे थे तबसे इस्कूलकी बसमे छोडता था..चलो अब तुम्हारे माबापके सामने तुमको सबक सिखाना पडेंगाच..वो बडा लोग क्रॉस करके जाता; अब तुमभी ? '

दरवाजातच उभं राह्यलेल्या बद्रीची ही कॉमेन्ट्री ऐकून बायकोने चमकून माझ्याकडे बघितलं, मी नजर चुकवली नि बद्रीला दारातल्या

खुर्चीवर बसायची खूण केली..तो मागे वळून बघायला लागला..मागे कोणी नव्हतं..

'किसे देख रहे हो ?'

'वो बबलूभी आया था, लगता हे चला गया..मेभी चलता साब..'

'जरा रुको..' म्हणत मी बेडरुमकडे वळलो..पाकिट आणायला..

मला वाटलं ह्याला पेशाची अपेक्षा असेल..

'नै साब..हमको बख्शीश नै मंगता..हम तो इन लोगोंको अपने बच्चे जेसा समझता हे.'

असं बोलताना त्याच्या फ़ूल पडलेल्या डोळ्यात पाणी आलं ! इतका जिव्हाळा !

मी त्याला बक्षीस देऊन बोळवायला बघत होतो ह्याबद्दल माझी मलाच शरम वाटली ..

एक गोष्ट खरी होती कि स्कूलबस लवकर आली नि बायकोला यायला उशीर झाला तर हा बद्रीच बऱ्याचदा वॉचमनला सांगून गेटवरच्या केबिनमधे प्रशांतला बसवून मग जायचा.

'लेकिन चाय तो पीके जाओ..बेठो थोडी देर..' बायकोचं व्यवहारद्न्यान असं उपयोगी येतं..

असंही ती दिवाळीला वॉचमनबरोबर बद्रीलाही फ़राळाचं देत असे, पण तो ते बहुतेक कोणाला तरी, बहुतेक रात्रपाळीच्या

वॉचमनला देऊन टाकत असावा..कारण त्याचं घर किंवा कुटुंब असल्याचं कोणालाच माहित नव्हतं ! बायकोने मग प्रशांतबरोबरच त्यालाही घरच्या पाव्हण्यासारखी अगदी स्टीलच्या ताटलीत खिचडीही दिली..

चहा घेऊन तो जरा भारावून प्रशांतच्या पाठीवर हात फ़िरवून 'संभालना बेटा !' असं म्हणून जायला निघाला , तेव्हां मी आतून माझा एक कोरा टी-शर्ट तो नको म्हणत असतांनाही त्याच्या हातात कोंबला..भारावल्यासारखा त्याने मग खाली वाकून पायांना हात लावल्यासारखं केलं तेव्हां आम्हा दोघांनाही अवघडल्यासारखं झालं..

त्याची पाठ वळली तेव्हां मीही डोळे पुसले..प्रशांत आणि बायको दोघंही माझ्याकडेच पहात होते .

'प्रशांत, बेटा ह्यापुढे कधीही त्या लेव्हल क्रॉसिंगला वळायचंसुद्धा नाही !'

आणि आत जाणाऱ्या बायकोकडे पहात कानाच्या पाळीला हात लावला..

'आपणही आता लेव्हल क्रॉसिंगवर जायचं नाही !" असा मनोमन निश्चय करूनच !

** **

** गोष्ट एका सिग्रेटची...**

सरकारी खर्चाने जावं तशी संवय नसलेल्या कॉर्पोरेटच्या स्टाफ़ला सेकंड एसी च्या डब्यात जरा गुदमरायलाच होतं, विशेषत: सिग्रेटीची तलफ़ आली की...

एका सामान्य ट्रस्टमधे कन्सल्टन्ट म्हणून लेट जॉइन्ट केल्यावर एवढेच पर्क्स मिळणार..!

दरवेळी बाहेर जाऊन टॉयलेटच्या दरवाजाजवळ नाही तर बंद असलेल्या कोचच्या दाराजवळ सिग्रेट फ़ुंकत रहावं तेही गाडी हलत असतांना ही खरी कसरतच..त्यातून ह्याच फ़िल्डमधला एखादा जोडीवाला भेटला तर भाव मारत येतो नि थोडा टाईमपास होतो...जनरल गप्पांमधे.

मात्र त्यात एक तोटाही संभवतो कधीतरी..औपचारिकता म्हणून सिग्रेट ऑफ़र करावी तर लिमिटेड स्टॉकमधे भागिदार निर्माण होतो !

त्यात वेळ रात्रीची असली कि बाहेरही काही प्रेक्षणीय नसतं.., अंधाराशिवाय..! दिवसा मागे पळणारी झाडं, इमारती नि रात्री मिणमिणते दिवे, स्टेशन मागे गेलं कि जरा झगमगाट असतो..आणि आतमधे कोणी भागीदार, जुजबी गप्पांमधे सामील करून घेतो, तेही सिग्रेटच्या बदल्यात..

हा असाच समोर आला नि तात्पुरता का होईना फ्रेन्ड झाला..झोपायच्या आधीची कि जेवल्यावर तलफ़ म्हणून हेरूनच माझ्या पाठलागावर आला असावा.

त्यातून दोघंही एकेकटेच..जरा मागेपुढे असलेल्या कंपार्टमेन्ट मधले..

'हाय ! ' ही अनोळखी संभाषणाची नेहमीची सुरवात..

"हेलो, आय ऍम ट्रेव्हर..फ्रॉम नागपूर !"

आता गाडी नागपूरला चाललीय म्हणजे हा तिथलाच असणार हे आपलं असंच, उपचार म्हणून.

'येस, आय ऍम फ्रोम मुंबे..गोइंग फ़ोर सेल्स मीट..'

'मराठी ?'

'ऑफ़ कोर्स..बट..'

'डोन्ट वरी..मीसुद्धा मराठीच..आम्ही नागपूरकर कॅथलिक चांगलं मराठी बोलतो नि सांबारवडीही खातो..'

मला हंसायला आलं..त्याची सांबारवडी ही माझ्यासाठी मुंबे-पुण्याची कोथिंबीर वडी.

'आम्ही परेरा...गोवाहून इकडे येऊन सेटल झालेले.. मे बी फ़ॉर जनरेशन्स..सर्व कल्चर इज ऑलमोस्ट मराठी, एक्सेप्ट द सर्व्हिस इन चर्च..'

' छान मराठी येतंय कि तुम्हाला..'

'तुला...तू मला तू म्हण.. माझी सासू ओरिजिनली गोवन, लोबो..पण तुमच्या मुंबेत सेटल झालेली..तिकडे सर्व इंग्लिश, चर्चमधेपण.. इकडे तिला थोडा डिफ़िकल्ट गेला..'

डोक्यात कांहीतरी चमकलं..परेरा नि लोबो..ही दोन्ही आडनांवं परिचयाची..पण वीसेक वर्षांपूर्वीची.

ऐकू तर या काय म्हणतोय..तो एकदम पर्सनल माहिती सांगायला लागला, नि वाटलं हा नुसताच फ़ुकट्या सिग्रेट पार्टनर नाहीय..

तू मुंबेला कुठे ?'

'गिरगांव..!'

"पक्का मराठी ! 'देट मीन्स यू मस्ट बी अ ब्राम्हण..'

'येस. जोशी.." माझं जोशीपण बहुतेक चेहऱ्यावर गोंदलं असावं कुठेतरी..

पण त्याने ब्राम्हण शब्द नेमकेपणाने उच्चारला..मी फ़क्त मान हलवली.

'माय वाईफ़ न्यू अ बिट ऑफ़ मराठी..'

'आत्ता मुंबेत कुठे गेला होतास ?' मी त्याच्या सूचनेनुसार एकेरीवर आलो..

'बायकला..." हे टिपिकल मुंबेकर कॅथलिक उच्चार..

'ममी हेड अ रूम देअर..ते सेल करून आला..माझा ब्रदर इन लॉ इज शिपी, तो शिपवर गेला मग..तिकडे कोण नाय राह्यला..'

'मग ममी कुठेय आता ? ' त्याने वर बोट केलं..

'ओह, सो सॉरी ! ' मुंबेकर औपचारिकता..बरीचशी ऑफ़िसमुळे आलेली..

"डुइंग अ जॉब ?"

हे काय विचारणं झालं? मीच सांगून टाकलं होतं कि सेल्स मीटला चाललोय. कन्सल्टन्टला नेक्स्ट इयरच्या प्रोडक्शन लाईनची डिटेल्स तयार ठेवायलाच ह्वीत..मेल केली तरी पर्सनल डिस्कशन हवंच..डिझाईन्स सिलेक्ट करायची होती..!

त्याच्या लक्षात आलं असावं, मग म्हणाला.." आय मीन कुटे जॉबला ?"

" अ चॅरिटेबल ट्रस्ट..वर्किंग इन द फ़िल्ड ऑफ़ चाइल्ड एज्युकेशन ! '

"स्ट्रेंज ! ट्रस्ट आणि सेल्स..?"

"या..कॉज आय लेफ़्ट अर्ली इन व्हिआरएस..ऍन्ड जोइन ऑन अ कॉन्ट्रेक्ट , ऍज कन्सल्ट्न्ट ! "

" ते कसला काम करतो ? आय मीन त्यांचा सेल कसला ?"

" चॅरिटेबल ट्रस्टला पण फ़ंडिंग पायजे ना बॉस...सो वुई सेल सम प्रोडक्ट्स टू मीट अवर फ़ायनान्सेस.."

" ओह, इज इट दॅट वे ? यू मीन लाईक हेल्पेज ऑर क्राय..."

"ऍक्झॅक्टली! इव्हन बीएनएसएच सेल प्रोडक्ट्स लाईक कॅलेन्डर्स.."

" गुड कलेक्शन असणार.."

"ऑफ़ कोर्स..शिवाय आम्हाला कॉर्पोरेट फ़ंडिंग आहेच ना !"

"फॅमिलीबरोबर रहातो का ? '

येडंच आहे ! मी नुसती मान हलवली.

'इज इट अ गुड जॉब ? "

" याह, बट नॉट वुइथ अ गुड सॅलरी..पूर्वीसारखा नाय.. कॉर्पोरेटमधे छान होता. वुइथ ऑल पर्क्स...ऑफ़ कोर्स, आय लेफ़्ट वुइथ गुड कॉम्पेन्सेशन.."

"व्हेरी अर्ली यू लेफ़्ट ?"

" आफ़्टर फ़िफ़्टी ...तिकडे काय स्कोप नाय होता, कंपनी बिझनेस वाइन्ड अप करत होता, मग दिला सोडून "

नकळत मीही त्याच्यासारखंच बोलायला लागलो होतो !..

"गुड ! माय सिस्टर इन लॊ ऑल्सो टुक अ चान्स..असा पण ओल्ड लेडी माज्याजवळ आला होता..मंग तेपण इकडे आला..व्हॉट वुईल शी डू देअर अलोन..'

"यू मीन सासू, ती एक्सपायर झाली ती.?."

" हां यार..व्हॉट टू टेल यू..ओल्ड लेडी केम टू लुक आफ़्टर माय वाईफ़ ऎज शी वॊज सिक वुइथ ब्रेस्ट कॆन्सर..दॆट टू थर्ड स्टेज...ब्रेस्ट ऑपरेट करू नाय शकत होता..त्या टाईमला वुई वेन्ट टू मुंबॆ, फ़ॊर अ व्हाईल..वाईफ़च्या किमो साठी..! बट बाबाचा स्कूलसाठी..मी अपडाऊन केला फ़ॊर सम टाईम.."

माझ्या डोक्यात हळूहळू कायतरी चक्र सुरू झालं..नियती कोणाला कुठे पाठवील..!

"मग तू परत आलास इकडे ?"

"हां. बाबा स्कूलमधी जातो न माजा जॉबभी इकडेच..आय कुडंन्ट अफ़ोर्ड टू लिव्ह ऑल दॆट.. मग इकडेच ट्रीट्मेन्ट चालू केला न ओल्ड लेडिलाच इकडे आणला..टेन यर्स अगो..'

तो नर्व्हस दिसला..मलाही जरा अस्वस्थच वाटलं ऎकून . कुठेतरी लिंक जुळत होती ! .पुन्हा एकेक सिग्रेट..ओघानेच आलं ते...

कन्फ़र्म करायसाठी एकदा विचारावं वाटलं, ' तुझी वाइफ़पण जॉब करत होती का ?'

'याह, शी लेफ़्ट आफ़्टर मेरेज..इकडे चांगला जॉब नाय भेटला तिला; तेच्या करून मग तिना डिप्लोमा करून टिचींग चालू केला..!'

नक्कीच एलिनॉर...ही सगळी माहिती बरोबर जुळत होती..लग्नानंतर एली नागपूरला गेली तेव्हां मी तिथेच होतो, कंपनीच्या कॉर्पोरेट ऑफ़िसमधे..

आता तो म्हणतोय ती सिस्टर इन लॉ म्हणजे पॅमेलाच असणार..एलीच्याच जागी आलेली तिच्याहून जरा फ़ेअर लुकिंग असलेली तिची बहिण पॅमेला..!

पुढे जाऊन तिच्याशी सूर जुळले होते !

फ़्रेन्डशिप म्हणताना त्याच्या जरा पुढे पण लिमिट संभाळून....कारण ...मी मध्यमवर्गीय पांढरपेशा गिरगांवकर ! मग फ़्रेंड कम ऍडव्हाईजर फ़क्त शिल्लक राह्यला..

पण ही ओळख देणं योग्य वाटलं नाही कारण एली आता जगात नाही हे मला माहित असलेलं सत्य त्याच्याही तोंडून आलंच.. नागपूरला जाण्यापूर्वी शेवटच्या भेटीत (!) पॅमेलाने सर्व सांगितलं

होतं..एलीची ट्रीटमेन्ट सुरू असतांनाच ती फ़ार दिवस काढ्णार नाही ..हे कळलं होतं नि त्या शोकने असेल, तिची ममा पुढे गेली हेही समजलं होतं.

शाळकरी मुलगा एकटा पडला..त्याच्यासाठी मग मुंबेत एकटी रहात असलेली पेमेला वाईन्ड अप करून तिकडेच शिफ़्ट झाली, हे स्वाभाविकच होतं..

आमच्यातले बंध तसे अगदी वरवरचे म्हणजे फ़्लर्टिंग लेव्हलचे नव्हते तरी खोलवर रुजण्याएवढे टिकाऊही नव्हते ! म्हणजे तशी शक्यताही नव्हतीच..

तिने योग्य वेळी योग्य पर्याय निवडला..खटकत होतं तरी तेच शहाणपणाचं होतं ! मीही स्वत:ला त्यातून सोडवून घेतलं नि माझ्या साध्यासुध्या परिवारात स्वत:ला गुंतवून टाकलं.

ह्या क्षणी पेमेलाबद्दल उघड बोलणं जड गेलं असतं..आडवळणाने विचारावं तर कसं, कळेना..पण तोच पुढे म्हणाला..' माय सिस इन लो टुक गुड केअर ऑफ़ ऑल ऑफ़ अस..'

चला, म्हणजे पेमेला आता इथलीच झाली, म्हणजे ती कायतरी जॉब वगैरे करतच असणार..आता विचारायला उरलं काय..! फ़क्त तिचं लग्न ? हा सहज उद्भवलेला प्रश्न !

सिग्रेट संपली नि दोघंही औपचारिक गुड नाईट करून एक कंपार्ट्मेन्ट सोडून असलेल्या आपापल्या बर्थवर गेलो..तो कदाचित झोपलाही असेल..पण मला कधीकाळच्या मैत्रिणीचा एवढा सगळा भूतकाळ जाणून घेतल्यावर सहज झोप येणं शक्य नव्हतं..!

नियती! दोन्ही बहिणींशी तसे चांगले संबंध होते.. आधी एलिनॉरशी कारण तिच्या मुळे मी तिच्या त्या ममीला भेटलो होतो.. जिने बायकोच्या सेफ़ डिलिव्हरीसाठी एका बुधवारी फ़्लाइंग नविना ठेवला होता..उशिरा होणाऱ्या मुलाच्या जन्माच्या वेळी..! हे जरा वेगळं होतं, मनाला भिडणारं असं..बायकोही भारावून गेली होती..दोघांना घेऊन त्या "आज्जीला " भेटायला गेलो होतो...

त्या विशुद्ध आत्म्याच्या आशिर्वादासाठी !

पॅमेलाची भेट नंतर झाली..एलीनॉर सोडून गेल्यावर ती इन्टरव्ह्यूसाठी आली तेव्हां.. पर्सनलच्या ज्युनिअरशी संपर्क ठेवून होतो..त्याने काय केलं माहित नाही पण त्याच्याच थोरल्या साहेबाने तिला आपलीच पी.ए. केली..

तेव्हां बॉयफ़्रेन्ड नुकताच गल्फ़मधे गेल्यामुळे तिचा ब्रेक अप झाला होता..

आधी घरगुती संबंधामुळे नि मग सिम्पथी म्हणून भेटी होतच राह्यल्या...त्यात कोणालाही कांही गैर वाटलं नाही..आमची गाडी पुढे सरकली.. डेटिंगपर्यंत प्रगती झाली तरी..लोकांना कॉमन फ़्रेन्ड वाटावे

इतपतच प्रगती होती...कदाचित माझं मेरिटल स्टेटस नि वय ह्यामुळे तिला अवघड वाटत असावं..ती फ़्लर्ट नव्हतीच..!

मग ते तिथेच थांबायचं होतं..मला डेप्युटेशनवर पाठवलं, रिजनल ऑफ़िसला..थोडं लांब गेलो नि भेटीत नियमितपणा उरला नाही माझ्या थोड्या दिवसाच्या बदलीमुळे..

दरम्यान दोनेक वर्ष गेली..नि एलीचं हे असं झालं नि सगळंच तिरपागडं झालं..मुंबईत किमोसाठी आली तेव्हां एलिला फ़क्त एकदाच भेटलो..नंतर हिम्मत नाही झाली..!

फ़ायनली वाईन्ड अप करण्याच्या प्रोसेसमधे मी पॅमेलाला जमेल तेव्हढी मदत केली..

दुरावण्याच्या क्षणी भारावून तिने फ़क्त एकदा हग केलं नि ती दूर झाली..पुढे कधीच कॉन्टॅक्ट केला नाही, निग्रहाने !

आता जे समोर आलं त्यातून तिच्या लग्नाबद्दल वगैरे कांही कळलं नाहीच...!

केव्हांतरी डोळा लागला...जाग आली ती कुठल्याशा स्टेशनवर गाडी थांबलेली असतांना, कॅन्टिनच्या चहा-कॉफ़िवाल्यांच्या नि रेल्वेच्या घोषणांमुळे.. आधीचं स्टेशन असावं..

बेसिनजवळ दिसला म्हणून औपचारिकतेने त्याने चहाचं विचारलं.. कदाचित त्याला सिग्रेटची परतफ़ेड करायची असावी..पण

मग तो चहा घेऊन माझ्याच कंपार्टमेन्टमधे येऊन बसला..आपली बॅकपॅक अडकवूनच...

मी ब्रीफ़केस भरून लॉक करतांना तो बोलला कांहीच नाही..पण लक्षपूर्वक बॅगेकडे पहात असल्यासारखं वाटलं..

उतरायच्या आधीच तो मग तयार होऊन आला, म्हणजे कपडे ठीक ठाक करत माझ्या समोर येऊन बसला..फ़ारशी थंडी नसतांनाही त्याची मरून रंगाची हाताने विणलेली मंकीकॅप घालत होता..विचित्र वाटलं तरी न बोलता मी त्याच्या हालचालींकडे पाह्यलं..तोच इशारा समजून तो पुढे म्हणाला.." आय प्रॉमिस्ड हर...मी ही नेहमी वापरणार म्हणून.."

'मी प्रश्नार्थक भुवया उंचावल्या..कोणाला प्रॉमिस केलं होतं ? एलीला कि पॅमला ? खोटी जिद्न्यासा ! कि आशेचा एक तंतू ?

'अरे, एली मेड इट फ़ॉर मी..व्हेन शी वॉज कॅरिंग शी मेड इट फ़ॉर मोशे.. बट इट वॉज टू लार्ज फ़ॉर हिम..मग तिना तेच्यासाठी दुसरा बनवला, व्हेन शी वॉज सिक शी गेव्ह धिस टू मी..

आय प्रॉमिस्ड हर, मी ऑलवेज ही यूज करणार..' त्याचे डोळे पाणावल्याचा भास झाला..मी त्याच्या हातावर थोपटल्यासारखं केलं..पण एक अर्धवट समाधान, हे पॅमने नाही केलेलं..!

..कारण तिने माझ्यासाठी स्वेटर विणायला घेतला होता, तो अर्धवट राह्यला ! कोण जाणे त्याचं काय झालं !

माझ्या हेन्डबॅगेवर कांहीच नव्हतं..पण ब्रीफ़केसवर इनिशिअल्स होती..व्ही आणि जे..वसंत जोशी..तो चटकन बोलला, व्ही एस.. म्हंजी ते वसंत जोशी काय ?

मी फ़क्त मान हलवली..अजूनही मी माझी कंपनी वगैरे कांहीच उघड केलं नव्हतं! कांही क्षण तो माझ्याकडे बघत राह्यला..मी चहा पिण्याच्या बहाण्याने चेहरा निर्विकार ठेवण्याचा प्रयत्न केला..

मनात विचारांचं वादळ..ह्याला पॅमेला आमच्या रिलेशनशिप विषयी कांही सांगणं शक्य नव्हतं... म्हणजे असा माझा समज होता.. मग एलीने कांही सांगितलं का कोण जाणे.

"तू मर्क्समधी होता काय ? ' मी न्युट्रल रहाण्याचा प्रयत्न करत फ़क्त मान हलवली..

"दॅट मिन्स व्हिआरएसच्या टायमाला तूबी तिकडेच होता काय? तवाच... एलि मला बोललेला...!" मी एकदम टाईट..आता हे एवढ्यावरच राहू दे , पॅमचा विषय नको यायला असं वाटत होतं..

एक स्वाभाविक प्रश्न त्याला अपेक्षित असणार...

' पॅम आता काय करते ? ' मी न विचारताच तो म्हणाला , 'पॅमबी माज्याजवलच असते..'

मग आवाज हळू करत आजूबाजूला पहात बोलला , 'वुई आरे इन लिव्ह इन..मी आता रिटायर्ड होणार..मोशे कॉलेज कॅम्पसला गेला..ही नोज इट. कॉज ही कॉल्स पॅम ऍज ममी ओन्ली..'

धक्का होता, पण अनपेक्षित नाही..त्याने माझ्या चेहरा वाचला असणार...

लेट अस हॅव अ सिग्रेट ?

मी पाकिट पुढे केलं नि हंसलो..

'बाहेर जायला पडेल ना ..त्याने पाकिट खोललं तर एकच सिग्रेट..'

'अरे फ्रेन्ड, ही ऱ्हाऊ दे तुलाच..आय वुइल बाय ..चल आता गाडी थांबेल..'

गाडी हळू हळू स्टेशनात शिरत असतांनाच तो त्याची बॅकपॅक नि लगेज घेऊन निघालासुद्धा..

पुन्हा मागे वळला..खट्याळ म्हणावं असं हंसत म्हणाला,

' आय रेड युअर फ़ेस..डोन्ट वरी.. पॅमने मला काय नाय सांगितला..! "

तो चटकन गेलासुद्धा..

मी एकदम थंड.. भर उकाड्यात लोकरीची कानटोपी घातलेल्या त्याच्या पाठमोऱ्या देहाकडे पहात राह्यलो...वाटलं तो स्वेटरही ह्याच्याच अंगात असायला हवा होता..

हातात सिग्रेटचं पाकिट तसंच धरून मीही उठलो, एक सिग्रेट काय, अख्ख पाकिट त्याच्यावरून ओवाळून टाकावं असा, दोनदोन कडवट आठवणी संभाळणारा समजूतदार मित्र..फ़क्त एका रात्रीच्या प्रवासापुरता !

******

** प्लेटफॉर्म **

"ए सोमाभाय, पेला पाणी लई आव ने डिकरा "

स्टेशनवरच्या केबिन नांवाच्या एकुलत्या एका खोलीतनं, बाहेर जुन्या जमान्यातला लटकवलेला पितळी टोल साफ़ करत असलेल्या सोमा नांवाच्या एकुलत्या एक कळकट्ट हेल्परला आस्पि नांवाच्या स्टेशनमास्तरने हांक मारली..

करत कांहीच नव्हता..टेबलवरच्या जुन्या टेलिफ़ोनशी खेळत बसला होता..मोबाईल नांवाच्या खेळण्यापासून तो अजून लांब होता..

डबी नुसती खिशात होती, उपयोग शून्य कारण नेटवर्क नाही..मोबाईल टॉवर दोनेक किलोमीटर लांबच्या हायवेजवळ..चार्ज करायला वीज होती हेच चिकार..कोळशाच्या इंजिनवाल्या पॅसेन्जर नाहीतर मालगाड्या जाणार..तेव्हां तो टोल वाजणार म्हणून एकाग्रतेने सोमाभाय तो स्वच्छ करत होता.

त्याने तत्परतेने आत जाऊन कोपऱ्यातल्या बेसिनवर ग्लास भरला..

"अरे वो नै, इडियट..पिनेका वास्ते ! बोट्लमाथी, अमेरा गेरथी लाव्यासे ने.."

क्वचित एखादाच शब्द बोलणाऱ्या सोमाभायने मग कोपऱ्यातल्या टेबलवरची बाटली त्याच्या पुढ्यात ठेवली..

"आजे तने चाय नथी बनावेली ? "

सोमाने नुसती मुंडी हलवली नि त्याच टेबलवरच्या इलेक्ट्रिक शेगडीवर ठेवलेल्या दांड्याच्या

भांड्यातून टेबलावरचा उपडा मग उताणा करत चहा ओतला..

"अरे स्टुपिड, गरम तो कर.."

एकदा चहा पिऊन परत मागणाऱ्या साहेबाचं डोकं फ़िरलंय अशा नजरेने पहात त्याने शेगडीचं

बटन ऑन केलं..! ...

गुजरात राज्यातलं बिलिमोराच्या आगलंमागलंच कुठलंसं छोटं स्टेशन..एखाद्या जुन्या निर्जिव वास्तूसारखं..फ़क्त अर्ध्या छपराचे दोन सुस्त प्लॅटफॉर्म असलेलं..दिवसातून एखाददुसरी पॅसेन्जर थांबणार.. मालगाड्यांची जा-ये असावी..स्टेशनमास्तर कम बुकिंग क्लार्क कम पोर्टर असा सबकुछ एकच माणूस..आस्पि दस्तूर..

रेल्वेच्याच आवारातल्या पत्र्याच्या शेडमधे राहून भल्या पहाटे प्लॅटफॉर्मवरच्या नळावर अगदी जांघा घासून मनसोक्त अंघोळ करणारा सोमा नांवाचा एक कुली कम सफ़ाईकाम करणारा. जमेल तेव्हां साहेबाला चहाबिस्किटं पुरवणार, तेही दूरवर जाणाऱ्या रिक्षावाल्यामार्फ़त आणवून...

रिक्षाही मोजून तीन..हायवेकडेच्या गॅरेजजवळ रहाणाऱ्यांच्या.. त्याच वस्तीत जाणारा एखादा पॅसेन्जर उतरला तर सवारी मिळणार.. नाहीतर हायवेला लागून असलेल्या हॉटेलवाले किंवा गॅरेजवाले ह्यांचा माल नेआण करणार. मग वाडीतल्यांना नि स्टेशन परिसरातल्या लाकडी पट्ट्यांच्या टिपिकल रेल्वे क्वार्टर मधे एकटा रहाणाऱ्या आस्पि दस्तूर नांवाच्या स्टेशनमास्तरला; ह्या वाडीतल्या एकुलत्या एक 'सबकुछ " मास्टरला लागणारं सामान आणून देणार..

चुकून माकून बाईक घेऊन एक तगडा हिरो यायचा महिन्या दोन महिन्यातनं एखाददाच....तो आला कि स्टेशनवरचं नाही तर वस्तीतली दोनतीन कुत्री त्याच्या मागे लागणार..त्या बाईकवाल्याचं ह्या ओसाड स्टेशनवर "कोणीतरी " विशेष माणूस येणार असेल तेव्हांच तो बाहेर बाईक लावून ह्या मास्तरच्या खोलीत पॅसेंजरची चॊकशी करायला यायचा..कारण वेटिंग रूमची चॅन त्या दोन तोकड्या प्लॅटफॉर्मवाल्या स्टेशनला परवडत नसावी. पण ते माणूस क्वचितच यायचं नि आलं कि लगेच बाहेर पडून, बाईकला किक मारून तो चालू पडायचा..

ते वातावरण सुगंधित करणारं विशेष माणूस कधीतरी आत येऊन बसावं असं बावाजीला उगाच वाटून जायचं..पण ते कधीच व्हायचं नाही..पण त्या निमित्ताने त्या सुस्त प्लॅटफॉर्मला जाग आल्यागत व्हायचं, कांही क्षणतरी !

मात्र आपल्या पुढयातली एकुलती एक व्हिजिटर चेअर नि क्वचित आपला चहाचा मग त्या हिरोला ऑफ़र करणं हे नेहमी व्हायचंच.. ,

"बेसो न भाय.."

अस्वस्थ झाल्यासारखा तो भाई मनाविरुद्ध बसला कि बावाजी सुरू..फ़ार नाही, एखाद्या वाक्याची देवाण घेवाण अपेक्षित असायची..

' आजे वेल्ला आवी गया तमे !"

समोरून सुस्त शांतता..मग..

"अरे सोमाभाय..पेली चाय लई आ ने.."

सोमाभाईही तत्पर असायचा..पण पाव्हणा वेगळ्याच मूडमधे !

" नै जोईये,, थॅन्क्स.."

जरा कठोर वाटेल म्हणून पाव्हणा आपलं सिग्रेटचं पाकिट काढतो..नि ऑफ़र करतो..

मग बावाजी 'थॅन्क्स.." ची परतफ़ेड करायचा..

केव्हांतरी सिग्रेटसाठी माचिसची देवाण-घेवाणही व्हायची..बस्स, तेवढाच त्या दस्तूरचा जनसंपर्क. ..

एरवी त्याचे कपडे धुवून जाणारी, जवळच्या छपरी वस्तीतली एक परकरी पोर नि ते लंगडं कुत्रं ह्यांच्याशी दोनचार शब्दात संवाद आणि..जवळपास मुक्यानेच वावरणाऱ्या सोमाभाईशी एकतर्फ़ी संवाद..

....

हा आस्पि दस्तूर होताही मजेशीर पारशी ..त्याच लाईनवर पुढे कुठल्याशा गांवातल्या अग्यारीत दस्तूरजी म्हणून काम करणाऱ्या बावाजीचा मध्यमवयीन अविवाहित मुलगा..चाळीशीला आलेला..तसं त्याच्या बायच्या दूरच्या बहिणीची मुलगी आली होती..

गुलनार तिचं नांव..दात किंचित पुढे असले तरी चेहरा बरा होता..पण जाडी होती...

हा सुकडा..त्यातून ती मुंबईत राह्यलेली, फॅशनेबल.

म्हणून दोघांनीही तेव्हां विचार केला नसावा..ते तेवढंच राह्यलं.. तरी आस्पिचं स्वप्नरंजन सुरूच राह्यलं..त्याला अजूनही आशा होती..

ढगळ पांढरी पॅन्ट, तीवर आवळून बांधलेला जुनाट काळा बेल्ट नि कळकट काळा कोट..चुकून दिवसा इतर गाड्या पास होणार असतील तेव्हां डोक्यावर साहेबी हॅट घालून हातातली शिटी उगाच फ़ुरफ़ुरवत बाहेर फ़ेरी मारणार..सोबतीला कुत्रं, त्याच्या मागे मागे चालणारं, तेही बहुतेक एखाद्या मालगाडीच्याच धक्क्यात लंगड्ं झालेलं, दोन टोकाच्या दोन बाकांपैकी एक त्याचाच.. दुसऱ्यावर सोमाभाई. ..

मधेच केव्हांतरी बायबापजीला भेट्ण्यासाठी हा " मास्टर " एका पॅसेन्जरने जाऊन परतणाऱ्या पॅसेन्जरने परत येणार..अगदी मर्यादित गरजा असलेला...दूध, हायवेकडच्या लोकल बेकरीतला पाव, अंडी नि

थोडीफ़ार प्रोव्हिजन. आणि मुख्य म्हणजे सिग्रेट..रिक्षावाल्यावर विश्वास टाकून मागवून घेणार..ड्रिंक वगैरेच्या फ़ंदात तो पडत नसावा..

स्टेशनमधून कांही फ़र्लांगावर दिसणारी पूर्वीची केंबळी छपराची नि आता पत्रे घातलेली बॅठी झोपडीवजा घरं..म्हणजे दहापाच घरात जास्तीत जास्त वीस-पंचवीस माणसं, त्यात अर्धे म्हातारे. तरणे आईबाप हायवेच्या रुंदीकरणाच्या कामावर गेले कि फ़क्त गोट्या, ठिकऱ्या असलं कांही खेळणारी चारपाच पोरं..त्यातल्या त्यात मोठी एक झिपरी परकरी पोर, स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवरून प्लास्टिकच्या कळशीने प्यायचं पाणी भरताना सांडून प्लॅटफॉर्म ओला करणारी..तेवढ्यापुरता सुस्त प्लॅटफॉर्म जाग आल्यासारखा वाटायचा कारण तिच्या मागनं तिचं अर्धनागडं लहान भावंडही यायचं..

दिसलाच समोर तर आस्पिला सलाम मारल्यासारखं करायची..मोडक्या तोडक्या अनागर

गुजरातीमिश्रित बोलीत कायतरी बोलायची..बोलण्यापेक्षा हंसणंच जास्त..कारण हा बावा तिला कपडे धुण्याचे पॅसे द्यायचा..ती मग रिक्षावाल्याकडून त्या नागड्या भावंडासाठी बिस्किटचा पुडा मागवायची..

सोमाभायने क्वार्टर उघडून दिली कि जाऊन बावाजीच्या पांढऱ्या कपड्यांना साबण लावून ठेवायची नि तिचं पाणी भरून झालं कि घासून धुवायची..

त्या वस्तीतल्या एका बोअरवर पंपाने पाणी उपसून बाकीचे व्यवहार चालायचे..संडास स्टेशनच्या आवारातच पण बाहेर पडायच्या गेटाजवळ..पहाटे लवकर सगळं व्हायचं.

रात्री एखादी मालगाडी पास होत असेल तेव्हां जागत बसलेला आस्पि क्वार्टरमधे गेला कि सगळे हळूहळू येऊन जायचे, विशेषत: बायामाणसं..क्वचित प्लॅटफॉर्मवरच्या बाकड्यावर हेंगाड्या बोलीत वादविवाद करत असायचे..

उलट्या पदराच्या गोल साडीला पाठीमागे कांचा मारून तोकड्या पदराने डोकं झांकलेल्या नि हातापायात रुप्याची कडी असलेल्या, बाया नि बहुतेक तसंच तोकडं धोतर नेसलेले नि अंगात बंडी नि डोक्याला लाल पागोटं घातलेले बुवे, बहुदा बुढ्ढेच..निदान दिसायचे तरी!

आज जरा वेगळंच चित्र दिसलं..प्लॅटफॉर्मच्या टोकाला असलेल्या बाकड्यावरून लंगड्या कुत्र्याला हुसकावून तिथे आसन मांडी घालून बसलेला एक इसम त्या सुस्त प्लॅटफॉर्मला जाग येईल इतक्या जोरजोरात कांही बडबडत असलेला नि त्याच्या पुढ्यात अगदी अजिजी करत असल्यागत बसलेला सोमाभाई..

तोही जरा स्वच्छ कपड्यातला नि केसांना तेलबील लावलेला..

हे दृष्य क्वार्टरमधून नुकताच प्लॅटफॉर्मवर पाऊल टाकणाऱ्या आस्पिला जरा वेगळंच वाटलं. एरवी घरनं यायच्या आधीच वस्तीवरची लोकं टॉयलेटवरून बाहेरच्या बाहेर गेलेली असत..

आता खरं तर जिला "ए सोकडी" म्हणून सगळे पुकारत ती परकरी पोर पाणी न्यायला यायची वेळ झालेली.. हा बहुतेक छोकरी वरून सोकरी नि उच्चारी सोकडी झालेला अपभ्रंश असावा...तीच ती, तिची प्लास्टिकची छोटी घागर घेऊन दुसऱ्या टोकाला असलेल्या नळावरून भरून घेऊन जाणार..आस्पिला नवल वाटे, एवढी सगळी माणसं हिच्या दोनचार घागरीतलं पाणी पुरवून कसं पीत असतील..

आलीच ती नि आस्पि त्याच्या रूमच्या ढ्कलदाराजवळ उभा असतांना "सलाम साब " असलंच कायतरी बडबडत पाण्यासाठी गेली.. आस्पिने सोमाला आवाज दिला..लांबूनच हात हलवून सोमाभायने खूण केली..एवढ्यात त्या बांकड्यावरच्या बुढ्ढ्याने आपल्या खणखणीत पण पिचक्या आवाजात जोरात हाक दिली.." ए सोकडी...ऐंय्या आवजे.." असलंच कायतरी..!

कांहीच न कळल्यासारखी ती "सोकडी " एका टोकापासून दुसऱ्या टोकाला गेली, बुढ्ढ्याकडे..

बुढ्ढ्याने तिला कायतरी विचारलं, तिने मुंडी हलवली..

सोमाभाई उभा रहात म्हाताऱ्याला कायतरी बोलला..नि मग त्या 'सोकडी'ला..ती झटपट दुसऱ्या बाजूच्या नळाकडे हंसत हंसत गेली..

मधेच आस्पिला सलाम करून.. तो अजूनही हाताने दार धरून उभा असलेल्या अवस्थेतच होता..

"आ सोमाभाय़ क्यारे चाय आपसे ?.."

"ए, गांडाभाय,,मारी चाय क्यारे लई आवीस ?"

म्हाताऱ्याला तिथेच सोडून जीभ चावत सोमाभाय धावत आला नि चहाच्या खटपटीला लागला..कधी नव्हे ते दोन्ही मग भरले.. अस्पिला वाटलं आज तोही पिणार असेल..

आस्पि येतांना आणलेलं बिस्किट बुडवून खात मधेच चहाचे भुरके मारायला लागला..एवढ्यात दुसरा मग हातात घेऊन सोमाभाई बाहेर जायला लागला.. जाताजाता सायबाला खूण करून एक बिस्किट मागितलं..आस्पिने दिलं..पण कुतूहल म्हणून तो दरवाजात येऊन सोमाभाई गेला तिकडे बघत राह्यला..तो थेट त्या बुढ्ढ्याकडे जाऊन चहा नि बिस्किट त्याला देतांना दिसला..आज काय तरी विशेष असावं..

ते विशेष दोनच दिवसानी समोर आलं..

एरवी कधी उगाच प्लॅटफ़ोर्मवर न येणारे त्या केंबळी झोपड्यातले आधी न दिसलेले बाप्ये नि दोनचार बाया काष्टीवाल्या नि घागरेवाल्याही.. घुंघट काढलेल्या..त्यातच ती लहान चणीची "सोकडी" ही नटलेली होती.. सगळा लवाजमा मास्टरच्या केबिनबाहेर मोर्चा घेऊन आला.. कारण "तो" बुढ्ढा सगळ्यात पुढे होता ना.. सोमाभाई नेहमीसारखा मास्टरच्या केबिनबाहेर नव्हता.. तो

आला तो एकदम धोती-सदऱ्यावर बंडी घालून.. त्या बुढ्ढ्याने पुढे होऊन मास्टरला मोडक्यातोडक्या हिंदी नि गावढ्या गुजरातीत कांही सांगायचा प्रयत्न केला..तेव्हां त्याला कळलं ते एवढंच कि ..

ते लोकं त्या 'सोकडी" शी सोमाभायचा साखरपुडा करायला आले होते, प्लॅटफॉर्मच्या नळ असलेल्या टोकाकडे..! त्याना सोमाभाईचा सगावाला म्हणून मास्टर यायला हवा होता..

ऐकून मास्टर जरा हेलावला..

तो दहाबारा माणसांचा सगळा लवाजमा तिकडे गेला नि नंतर मास्टरही.

बंद केबिनपुढे तो लंगडा कुत्रा..समजूनच राखण करायला.. त्याला बहुतेक आमंत्रण नसावं..

त्या बुढ्ढ्याने सोमाभाईला फ़ेटा बांधून टिळा लावला नि मास्टरने त्या सोकडीला सोमाभाईने आणलेला जोडा दिला तेव्हां त्याला आपणही कायतरी द्यावं वाटलं.. म्हणून हाताला आलेली नोट त्या जोड्यावर ठेवली..त्या "सोकडी" ने मास्टरच्या पायावर डोकं ठेवलं...!

त्या अनोळखी लोकात एक अनोखं नातं निर्माण झालं..नि एरवी सुस्त असलेला तो एकाकी प्लॅटफॉर्म अगदी धन्य झाला..

पुढे प्लॅटफॉर्मच्या कोपऱ्यात पताका लावून लग्नही झालं, अगदी गांवठी वाद्यांसह.मास्टरला खरोखरच आपल्या लेकीची पाठवणी करत असल्याचा फ़ील आला नि त्याचे डोळे उगाच पाणावले.

नेमकी एक थांबणारी पॅसेंजर आली, तेव्हां बावटा दाखवत शिटी वाजवणाऱ्या मास्टरनेच गाडी सुटतानाचा टोलही वाजवला..त्याचा नातलग झालेला सोमाभाई आपल्या नव्या नवरीसह बाहेर पडत होता.

एरवी बाहेर मोटरसायकलवर येऊन वाट पहाणारा तो तगडा हिरो आज मात्र त्याच गाडीतून उतरला नि त्याच्याबरोबरच ते केव्हांतरी येणारं सुगंधी माणूसही; हातात हात घालून !

प्लॅटफॉर्मवरचं वऱ्हाड बाहेर पडलं नि पाठोपाठ हिरो आपल्या सुगंधी माणसासह; तेव्हां न राहवून मास्टरने त्याना हंसून विश केलं.. ते हवेत तरंगणारं जोडपं, बाहेर पडून आज चक्क रिक्षात बसलं तेव्हां रिक्षावाले बघतच राह्यले..!

आणि आज एकही कुत्रं भुंकलं नाही !

इकडे आस्पि दस्तूर..स्टेशन मास्टर कम सबकुछ मग हवेत तरंगल्यागत केबिनमधे येऊन आपल्या खुर्चीत बसला , तेव्हां त्याच्या बंद डोळ्यांसमोर गुलनारचा चेहरा आला..

तो निर्जीव प्लॅटफॉर्म मात्र परत बिच्चारा होऊन शांत पहुडला..

****

कथा कशा वाटल्या?

कळवा

विजय खाडिलकर

दूरध्वनि: 23776889,

मोबाईल क्र. ९८२१२२२०४२

विजय खाडिलकर

यांची इतर सहा पुस्तके.